आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२१ डिसेंबर २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आसाममधे नामरूप इथं १२ हजार कोटी रुपये खर्चाच्या खत प्रकल्पाचं भूमीपूजन

- रेल्वेची भाडेवाढ येत्या २६ डिसेंबर पासून लागू होणार

- महाराष्ट्रात २८८ नगरपरिषदांच्या आणि २८५ नगराध्यक्षपदांच्या निवडणुकांची मतमोजणी सुरु

- १९ वर्षांखालील क्रिकेट आशिया चषक अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा भारताचा निर्णय

आणि

- देशाच्या उत्तर भागात धुक्याची दाट चादर/ कमी दृष्यमानतेमुळे वाहतुकीवर परिणाम

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या आसाम दौऱ्यावर असून या दौऱ्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी त्यांच्या हस्ते नामरूप इथं १२ हजार कोटी रुपयांच्या अमोनिया युरिया खत प्रकल्पाचं उद्घाटन झालं. आसाम विकासाच्या मार्गावर वेगाने प्रगती करत असून दिब्रू गढ ज्या औद्योगिक प्रगतीची स्वप्न पाहत होता, तो अध्याय आता सुरू झाला आहे, असं प्रधानमंत्री आपल्या भाषणात म्हणाले. या कार्यक्रमापूर्वी प्रधानमंत्र्यांनी शहीद स्मारक क्षेत्र इथे अवैध स्थलांतरितांविरुद्धच्या आसाम आंदोलनातल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली. तसंच त्यांनी ब्रह्मपुत्रा नदीतल्या बोटीवर स्थानिक शाळांमधल्या २५ विद्यार्थ्यांशी परीक्षा पे चर्चा केली.

प्रधानमंत्र्यांनी काल आपल्या दौऱ्याच्या पहिल्या दिवशी गुवाहाटीत गोपीनाथ बोरदोलोई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अत्याधुनिक टर्मिनल इमारतीचं उद्घाटन केलं. जवळपास सव्वा कोटी प्रवाशांना हाताळण्याची क्षमता असलेली ही इमारत एक लाख चौरस मीटरपेक्षा अधिक परिसरात पसरलेली आहे.

**<><><><><>**

रेल्वेने प्रवासभाडे आकारणीत बदल केले असून ते येत्या २६ डिसेंबरपासून लागू होणार आहेत. यात सर्वसामान्य वर्गाच्या प्रवास भाड्यात २१५ किलोमीटर अंतरापर्यंत काहीही बदल झालेला नाही. त्यापुढच्या सामान्य  वर्गाच्या प्रवासाकरता प्रतिकिलोमीटर एक पैसा तर मेल - एक्सप्रेस गाड्यांसाठी प्रति किलोमीटर २ पैसे भाडेवाढ झाली आहे. ५०० किलोमीटर अंतराच्या प्रवासाकरता १० रुपये जास्त मोजावे लागतील.

उपनगरी गाड्याच्या प्रवासभाड्यात बदल केलेला नाही असं रेल्वेच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात २८८ नगरपरिषदांच्या आणि २८५ नगराध्यक्षपदांच्या निवडणुकांची मतमोजणी सुरु झाली आहे. तीन नगराध्यपदांसाठीच्या निवडणूका याआधीच बिनविरोध झाली आहे. मतमोजणी केंद्रांवर उमेदवार आणि राजकीय पक्षांचे कार्यकर्ते यांची गर्दी आहे.

बीडमधे मतमोजणीच्या वेळी गोंधळ उडाल्यामुळे पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागला.

२ डिसेंबरला झालेल्या निवडणुकीत ६७ पूर्णांक ३ दशांश टक्के मतदान झालं तर २० डिसेंबरला झालेल्या टप्प्यात ४७ पूर्णांक ४ शतांश टक्के मतदारांनी आपला कौल यंत्रात बंद केला, असं राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे.

या निवडणुकीत स्थानिक पातळीवर महायुती आणि महाविकास आघाडीच्या घटक पक्षांच्या वेगवेगळ्या तडजोडी झाल्या होत्या तर काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होत्या.

<><><><><>

युक्रेनमध्ये रशियानं छेडलेलं युद्ध संपवण्यासाठी झालेल्या चर्चेच्या नव्या फेरीत, अमेरिकेच्या शिष्टमंडळानं काल फ्लोरिडा मध्ये रशियन अधिकाऱ्यांची भेट घेतली. ही चर्चा सकारात्मक होती, आणि ती आजही सुरु राहील, असं  रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचे विशेष दूत किरील दिमित्रीव्ह यांनी बातमीदारांना सांगितलं.

दरम्यान, दोन्ही बाजूंनी ओलीसांची देवाणघेवाण सुलभ झाली, आणि राष्ट्रीय नेत्यांमधल्या बैठकींचा मार्ग मोकळा झाला, तर युक्रेन, अमेरिका आणि रशियाबरोबर

त्रिपक्षीय चर्चेच्या प्रस्तावाला पाठिंबा देईल, असं युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी काल सांगितलं.

<><><><>

ऑस्ट्रेलियामध्ये ‘बोंडी बीच’ इथं गेल्या आठवड्यात झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांनी देशातल्या पोलिस आणि राष्ट्रीय गुप्तचर यंत्रणांचा आढावा घेण्याची घोषणा केली आहे. हा हल्ला थोपवण्यासाठी या यंत्रणा सुसज्ज होत्या का, याचा आढावा  एप्रिल २०२६ पर्यंत घेतला जाईल त्यांनी म्हटलं आहे.

ऑस्ट्रेलियात सिडनी मध्ये बोंडी बीचवर ‘ज्यू’ समुदायाच्या उत्सवादरम्यान, दोन जणांनी केलेल्या गोळीबारात १५ नागरिक मृत्युमुखी पडले होते.

<><><><>

व्हॉटस्अप वापरकर्त्यांसाठी इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने सूचना जारी केली असून, घोस्टपेअरिंग नावाच्या सायबर मोहिमेचा वापर व्हॉटस्अप खाती हॅक करण्यासाठी केला जात असल्याचं त्यात नमूद करण्यात आलं आहे. गुन्हेगार किंवा हॅकर्स प्रमाणीकरणाची आवश्यकता नसलेल्या पेअरिंग कोडचा वापर करून खाती हॅक करण्यासाठी डिव्हाईस लिंकिंग वैशिष्ट्याचा गैरफायदा घेत असल्याचे मंत्रालयाने म्हटले आहे. वापरकर्त्यांनी कोणत्याही संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये तसेच बाह्य संकेतस्थळावर आपला मोबाईल क्रमांक देऊ नये असे आवाहन केले आहे.

<><><><>

आज ‘जागतिक ध्यान दिवस’ साजरा होत आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेने गेल्या वर्षी २१ डिसेंबर हा दिवस ‘जागतिक ध्यान दिन’ म्हणून घोषित केला होता. ‘ध्यान दिवस’, आत्मभान आणि आत्मशांतीचं प्रतीक आहे. या निमित्तानं, न्यूयॉर्क इथल्या संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात ‘जागतिक शांती आणि सद्भावनेसाठी’, ‘ध्यान-साधना’ सत्र आयोजित करण्यात आलं होतं. यामध्ये योग प्रशिक्षकांबरोबर, जगभरातले राजनैतिक अधिकारी, आणि संयुक्त राष्ट्रांचे अधिकारी सहभागी झाले होते.

<><><><>

भारत आणि श्रीलंका महिला क्रिकेट संघांदरम्यानच्या टी-२० मालिकेतला पहिला सामना आज विशाखापट्टणम इथं होणार आहे. संध्याकाळी ७ वाजता सामना सुरु होईल. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली, भारतीय संघ महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या तयारीचा भाग म्हणून, श्रीलंकेविरुद्ध ५ टी-२० सामने खेळेल. पहिले दोन सामने विशाखापट्टणममध्ये, तर शेवटचे तीन सामने तिरुवनंतपुरममध्ये होणार आहेत.

<><><><>

एस ए एफ एफ महिला फुटबॉल स्पर्धेत काल ईस्ट बंगाल फुटबॉल क्लबने नेपाळच्या सशस्त्र पोलीस दल संघाचा ३-० असा पराभव करून स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं. काठमांडू इथल्या दशरथ मैदानावर झालेल्या या सामन्यात विजयी ठरलेला ईस्ट बंगाल फुटबॉल क्लब, हा आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकणारा पहिला भारतीय महिला क्लब बनला आहे.

<><><><>

उत्तर भारतात वातावरणातला दाट धुक्याचा थर, आणि कमी दृश्यमानता, या पार्श्वभूमीवर, विमानतळ प्राधिकरणानं विमान सेवेतला विलंब आणि वाहतुकीतल्या बदलांबाबतच्या सूचना जारी केल्या आहेत.

धुक्यामुळे रस्ते, रेल्वे आणि हवाई वाहतुकीत व्यत्यय येण्याची शक्यता लक्षात घेता, हवामान विभागानं नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला असून, दिल्ली, उत्तर प्रदेश, हरियाणा आणि चंदीगडमध्ये ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

<><><><>

दिल्ली सरकारने वायू प्रदूषण रोखण्यासाठी जीआरएपी ४ मोहीम तीव्र केली आहे. प्रदूषणाला कारणीभूत ठरणाऱ्या उद्योग आणि बांधकाम जागांवर कठोर कारवाईचा इशारा दिल्लीचे पर्यावरण मंत्री मनजिंदर सिरसा यांनी दिला आहे. नियमांचं उल्लंघन करणारे ६१२ उद्योग बंद करण्यात आले असून, तीन दिवसांत एक लाखाहून अधिक अधिक प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्रे जारी करण्यात आल्याचं दिल्ली सरकारच्या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><>

भारत आणि पाकिस्तानच्या १९ वर्षांखालच्या मुलांच्या संघांमध्ये आज दुबई इथं आशिया चषक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना सुरु आहे.

या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. त्यानंतर पाकिस्ताननं डावाला वेगानं सुरुवात केली. भारतानंही चौथ्याच षटकात सलामीवीर हमझा याला बाद करत पाकिस्तानला रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र सलामीवीर समीर मीनहास यानं दमदार शतकी खेळी करत, आधी दुसऱ्या गड्यासाठी उस्मान खान याच्यासोबत ९१, तर तिसऱ्या गड्यासाठी अहमद हुसेन याच्यासोबत १३७ धावांची भागिदारी करून, पाकिस्तानच्या मजबूत स्थिती गाठून दिली आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा एकेचाळीसाव्या षटकात पाकिस्तानच्या ३ गडी बाद २७८ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

धुकं आणि कमी दृश्यमानतेमुळे विमान वाहतूक विस्कळीत झाली, तर विमान कंपन्यांनी प्रवाशांच्या सोयींबाबतच्या नियमांचं काटेकोरपणे पालन करावं, आणि विमानतळांवर पुरेसे कर्मचारी नियुक्त करावेत, असे निर्देश केंद्रसरकारनं दिले आहेत. हवाई वाहतूक मंत्रालयानं आज याबाबतचं प्रसिद्धीपत्रक जारी केलं.

विमान कंपन्यांनी प्रवाशांना विमानाच्या स्थितीबाबत वेळेवर आणि अचूक माहिती द्यावी, प्रवासाला अधिक विलंब झाला, तर भोजन आणि अल्पोपहाराची व्यवस्था करावी, तिकीट रद्द झालं, तर पुन्हा आरक्षण अथवा तिकिटाच्या पैशाचा परतावा करण्याची व्यवस्था करावी, तसंच वेळेवर ‘चेक-इन’ केल्यावर ‘बोर्डिंग’ साठी मनाई करू नये, असं यात म्हटलं आहे. सामानाची हाताळणी आणि अल्पवयीन मुलांची देखभाल, याबाबतच्या सूचनाही यात दिल्या आहेत.

**<><><><><>**

देशाच्या उत्तर भागात थंडीचा जोर असून जम्मू- काश्मीर आणि हिमाचल प्रदेशात हिमवृष्टी होत आहे. अनेक ठिकाणी हिमवर्षावामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे.

जम्मू-काश्मीर, लडाख, मुझफ्फराबाद आणि गिलगिट बाल्टिस्तानमध्ये आज जोरदार हिमवर्षाव होईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्र, उत्तर आणि दक्षिण कर्नाटक आणि तेलंगणामध्ये आज थंडीची लाट राहील असा अंदाज आहे.

दिल्ली, हरियाणा, बिहार, छत्तीसगड आणि चंदीगडच्या काही भागात आज दाट धुक्याचा थर राहील, तर मध्य प्रदेश, ओदिशा, पश्चिम उत्तर प्रदेश, झारखंड आणि ईशान्य भारतातही अशीच स्थिती राहील असा अंदाज आहे.

**//<><><><><>//**